कोकणचे पहिले दैनिक

रत्नभूमि

2018-2020
ment of postage)

मूल्य : १.०० रूपये : वर्ष ५५ वे : अंक १४१ : रविवार दि. २० जून २०२१ : पृष्ठे : ४ : Em

# अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने एक हात मदतीचा...!



मुंबई, दि. १९ : अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने एक हात मदतीचा हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमअंतर्गत के.ई.ए. आणि टाटा रुग्णालयातील पेशंट चे जे गरीब नातेवाईक परिस्थितीमुळे फुटपाथवर राहतात व परिस्थिती अभावी उपाशी राहतात यांच्यासाठी एक वेळेचे जेवण, पाणी आणि मास्क वाटप करण्यात आले. त्या प्रसंगी सौ. भारतीताई पेडणेकर–शिवासेना महिला शाखा संघटक, श्री. मिनार प्रभाकर नाटळकर– मानद सचिव, परळचा राजा उत्सव मंडळ, सौ. वंदना राणे– उपशाखा संघटक, प्रमिला अडसूळ–उपशाखा संघटक, श्री. चंद्रकांत पेडणेकर ,श्री. प्रदीप मोगरे– उपशाखा प्रमुख, रुग्णसेवक यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली तसेच श्री. अमोल वंजारे– अध्यक्ष, श्री. संदीप मोहिते– मुंबई उपसचिव, श्री. सचिन जोईजोडे अध्यक्ष, सौ. वसुधा वाळुंज– अध्यक्षा, श्री. वसंत घुगे, कु. अंजली भोसले,श्री. मंगेश सावंत व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.